# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**(कुलसचिव यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

**डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले**
(एम.एस.सी., पी.एच.डी.)
कुलसचिव

संकेतस्थळ :www.unigug.ac.in
ई.मेल :faogug@gmail.com
दुरध्वणी क्र. : ०७१३२-२२३१०४


जावक क्रमांक/गो.वि./कु.स.का./८७७/२०२०

दिनांक : २६/०८/२०२०

## परिपत्रक

संदर्भ - मा.संचालक कार्यालयाचे पत्र क्र.उशिसं/शिष्य/२०१९-२०/डीबीटी/५४९१ दि. २५.०८.२०२०

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसित केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश असून दि.२५.०८.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण ४,४४८ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने महाविद्यालय व विभागस्तरावर प्रलंबीत अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतीम मुदतवाढ देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार महाआयटी कार्यालयाच्या ईमेलनुसार **सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरून ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जाची महाविद्यालयाच्या स्तरावरून पडताळणी करणेसाठी दि. १० सप्टेंबर, २०२० आणि विभाग स्तरावरून पडताळणी करणेसाठी दि. १५ सप्टेंबर, २०२० अशी अंतीम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ उपलब्ध होणार नाही तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबीत राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत. त्यामुळे आपल्या महाविद्यालयांच्या स्तरावर शिष्यवृत्तीचे प्रलंबीत अर्ज मुदतीमध्ये तात्काळ निकाली काढणेत यावे.

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावर प्रलंबीत अर्जाच्या बाबतीत संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील, कळावे,

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 8759 दि. 26/8/2020

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/शिष्य २०१९-२०/डीबीटी/ 5491 दि. २५.०८.२०२०

25 AUG 2020

**तात्काळ ईमेलद्वारा**

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

**विषय :- सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ :- महाआयटी कार्यालयाचा दि. २५.०८.२०२० रोजीचा इमेल.

राज्यशासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांची एकत्रितपणे अंमलबजावणी करणेसाठी विकसीत केलेल्या महाडीबीटी पोर्टलवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची विहीत कालावधीमध्ये पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळोवेळी मुदतवाढ देऊनही, दि. २५.०८.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण **४,४४८** विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालय व विभागस्तरावर प्रलंबित अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार, महाआयटी कार्यालयाच्या संदर्भिय इमेलनुसार, **सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १० सप्टेंबर, २०२० आणि विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी दि. १५ सप्टेंबर, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ उपलब्ध होणार नाही. तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

त्यामुळे आपल्या विभागामधील ज्या महाविद्यालयांच्या स्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत, अशा महाविद्यालयांचा आढावा घेऊन महाविद्यालयाच्या स्तरावर प्रलंबित अर्ज मुदतीमध्ये निकाली काढणेबाबत तात्काळ सूचना देण्यात याव्यात. तसेच दिलेल्या मुदतीनंतर महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठाच्या बाबतीत संबंधित कुलसचिव तसेच विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत संबंधित विभागीय सहसंचालक जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी.

Shri Junghare Nodal Officer

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

Circulate

प्रत :- १. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय, अशासकीय, अनुदानित, विनाअनुदानित - कायम विनाअनुदानित महाविद्यालये.

26/8/2020

| Directorate of Higher Education | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| DBT Scheme wise Application Status A. Y. 2019-20 | | | | | | | | | | | |
| DBT Dashboard [Last Report Updated: 25/08/2020 05:08:58] | | | | | | | | | | | |
| Sr. No. | Division | Application Received | Approved By Institute | Pending At Institute | Approved By Department | Cancelled | Pending At Department | Rejected | Sent back to applicant | Alloted | Alloted Amount |
| 1 | Amravati | 7,681 | 5,518 | 412 | 5,518 | 830 | 0 | 430 | 491 | 5,430 | ₹ 2,02,05,573 |
| 2 | Aurangabad | 41,885 | 32,942 | 1,093 | 32,942 | 4,781 | 0 | 1,472 | 1,597 | 32,457 | ₹ 14,79,39,695 |
| 3 | Jalgaon | 8,308 | 5,761 | 788 | 5,761 | 719 | 0 | 673 | 367 | 5,683 | ₹ 2,46,36,992 |
| 4 | Kolhapur | 51,288 | 45,246 | 134 | 45,246 | 3,377 | 0 | 564 | 1,967 | 44,576 | ₹ 26,29,85,033 |
| 5 | Mumbai | 2,610 | 1,530 | 141 | 1,530 | 534 | 0 | 161 | 244 | 1,465 | ₹ 1,56,77,206 |
| 6 | Nagpur | 8,503 | 6,651 | 238 | 6,651 | 1,003 | 0 | 236 | 375 | 6,515 | ₹ 3,82,96,648 |
| 7 | Nanded | 25,848 | 19,753 | 607 | 19,753 | 2,634 | 0 | 1,536 | 1,318 | 19,427 | ₹ 11,08,96,097 |
| 8 | Panvel | 5,665 | 3,979 | 180 | 3,979 | 743 | 0 | 319 | 444 | 3,888 | ₹ 3,18,78,050 |
| 9 | Pune | 55,234 | 43,797 | 642 | 43,797 | 6,066 | 0 | 2,342 | 2,387 | 43,275 | ₹ 23,59,82,726 |
| 10 | Solapur | 13,495 | 11,133 | 212 | 11,133 | 1,082 | 0 | 249 | 819 | 11,025 | ₹ 6,31,00,410 |
| | Out of Maharashtra | 14 | 11 | 1 | 11 | 1 | 0 | 1 | 0 | 10 | ₹ 2,27,330 |
| Grand Total | | 2,20,531 | 1,76,321 | 4,448 | 1,76,321 | 21,770 | 0 | 7,983 | 10,009 | 1,73,751 | ₹ 95,18,25,758 |